**ठळक बातम्या**

- पूर्व भारताच्या विकासाकरता बिहारचा विकास अत्यंत गरजेचा असल्याचं प्रधानमंत्र्यांचं प्रतिपादन / बिहारमध्ये मोतिहारी इथं केलं ७ हजार २०० कोटी रुपयांच्या विविध विकास प्रकल्पांचं भूमीपूजन आणि लोकार्पण

- सर्जनशील अर्थव्यवस्थेत कामासाठी धडपडणाऱ्यांना साधनसामुग्री आणि प्रशिक्षण देण्यासाठी सरकार वचनबद्ध असल्याची माहिती आणि प्रसारण मंत्र्यांची ग्वाही

- पहलगाम हल्ल्याचा सूत्रधार टीआरएफ गटाला अमेरिकेनं दहशतवादी संघटना घोषित केल्याचं भारताकडून स्वागत

**आणि**

- हंगेरीतल्या कुस्ती स्पर्धेत भारताच्या सुजीत कलकल याला 65 किलो गटात सुवर्ण पदक

**<><><><>**

देशातली पूर्वेकडची राज्यं प्रगतीपथावर असून पूर्व भारताच्या विकासासाठी बिहारचा विकास अत्यंत गरजेचा असल्याचं प्रतिपादन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज केलं. बिहारमध्ये मोतिहारी इथं सात हजार २०० कोटी रुपयांच्या विविध विकास प्रकल्पांची पायाभरणी, उद्धाटन आणि लोकार्पण आज त्यांच्या हस्ते झालं, त्यावेळी ते बोलत होते. रेल्वे, रस्ते, ग्रामीण विकास, मत्स्य व्यवसाय, इलेक्ट्रॉनिक्स आणि माहिती तंत्रज्ञान या क्षेत्रातल्या प्रकल्पांचा यामध्ये समावेश आहे.

एकविसाव्या शतकात जग वेगाने पुढे जातंय. ज्या प्रमाणे देशाच्या पश्चिम भागात मुंबई प्रसिद्ध आहे, त्याचप्रमाणे येत्या काळात मोतिहारी देखील प्रसिद्ध असेल, असा आपल्याला विश्वास वाटतो. असं प्रधानमंत्री यावेळी आपल्या भाषणात म्हणाले.

यानंतर पश्चिम बंगालमध्ये दूर्गापूर इथंही पाच हजार कोटीहून अधिक खर्चाच्या महत्त्वाच्या प्रकल्पांची पायाभरणी आणि लोकार्पण प्रधानमंत्र्यांच्या हस्ते होणार आहे.

**<><><><>**

मुंबई शहर चित्रपट आणि सर्जनशीलतेची राजधानी असून सर्जनशील अर्थव्यवस्थेत कामासाठी धडपडणाऱ्यांना साधनसामुग्री आणि प्रशिक्षण देण्यासाठी आपलं सरकार वचनबद्ध असल्याचं माहिती आणि प्रसारण मंत्री अश्विनी वैष्णव यांनी सांगितलं. मुंबईच्या राष्ट्रीय चित्रपट विकास महामंडळ कार्यालयाच्या परिसरात आज इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ क्रिएटिव्ह टेक्नॉलॉजीचं उद्घाटन केल्यानंतर ते बोलत होते. केंद्र सरकारने मे महिन्यात आयोजित केलेल्या वेव्हज उपक्रमाचा कार्य अहवालही यावेळी प्रकाशित करण्यात आला.

देशाच्या भविष्यासाठी विशेषतः तरुणांना मनोरंजन क्षेत्रात नव्या संधी उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीनं हा उपक्रम अत्यंत महत्त्वपूर्ण असल्याचं वैष्णव यावेळी म्हणाले. देशातल्या आयआयटी आणि आयआयएम शैक्षणिक संस्थांच्या धर्तीवर सर्जनशील तंत्रज्ञानासाठीही शैक्षणिक संस्थांची निर्मिती व्हावी, असा प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचा संकल्प आहे. यासाठी तंत्रज्ञान क्षेत्रातल्या विविध आंतरराष्ट्रीय कंपन्यांसोबत भागीदारी केल्याचंही वैष्णव यांनी सांगितलं.

**- होल्ड बाईट - अश्विनी वैष्णव -**

महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. माहिती आणि प्रसारण विभागाचे सचिव संजय जाजू, प्रसारभारतीचे मुख्य कार्यकारी अधिकारी गौरव द्विवेदी, राज्याचे सांस्कृतिक कार्यमंत्री आशिष शेलार इत्यादी मान्यवर यावेळी उपस्थित होते. केंद्र सरकारने मे महिन्यात घेतलेल्या वेव्हज् या उपक्रमामुळे सर्जनशील अर्थव्यवस्थेला चालना मिळाल्याची भावना मुख्यमंत्र्यांनी यावेळी व्यक्त केली. आयआयसीटीसारखी संस्था मुंबईत सुरु केल्याबद्दल केंद्र सरकारचे आभार मानले. यावेळी IICT च्या बोधचिन्हाचं अनावरण झालं, आणि या संस्थेत आता अध्यापनाला सुरुवात झाल्याचं घोषित करण्यात आलं. प्रसार भारती आणि राज्य सरकार यांच्यात यावेळी एक सामंजस्य करार झाला. IICT चे पहिले अभ्यासक्रम ऑगस्ट महिन्यापासून सुरु होणार आहेत. या संस्थेत १८ प्रकारचे अभ्यासक्रम शिकवले जातील, ज्यात गेमिंग, पोस्ट प्रॉडक्शन, ॲनिमेशन, कॉमिक्स, एक्स्टेंडेड रियालिटी अशा क्षेत्रांशी संबंधित विषयांचा समावेश असेल.

**<><><><>**

सीबीएसईच्या अभ्यासक्रमात छत्रपती शिवाजी महाराजांच्या कर्तृत्वाचा योग्य समावेश करण्यासंदर्भात महाराष्ट्राचे शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे यांनी केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांची भेट घेतली असून सीबीएसईच्या सातवी आणि दहावीच्या अभ्यासक्रमात छत्रपतींच्या कार्याचा समावेश करण्याचं आश्वासन प्रधान यांनी दिल्याची माहिती शालेय शिक्षण राज्यमंत्री पंकज भोयर यांनी आज विधानपरिषदेत दिली.

महाराष्ट्राचा राज्य महोत्सव म्हणून यंदापासून गणेशोत्सव साजरा होणार असून त्यानिमित्त होणाऱ्या विविध कार्यक्रमांची रुपरेषा आज सांस्कृतिक कार्य मंत्री आशिष शेलार यांनी विधानसभेत जाहीर केली.

**<><><><>**

अण्वस्त्र वाहून नेण्याची क्षमता असलेल्या पृथ्वी २ आणि अग्नि १ या आखूड पल्ल्याच्या बॅलास्टिक क्षेपणास्त्रांची चाचणी यशस्वी झाली आहे. ओडिशात चंडीपूर इथल्या एकात्मिक तळावरून या दोन्ही क्षेपणास्त्रांची कार्यचालन आणि तांत्रिक घटकांची पडताळणी पूर्ण झाली असल्याचं संरक्षण मंत्रालयानं म्हटलं आहे. पृथ्वी २ या क्षेपणास्त्राचा पल्ला साडेतीनशे किलोमीटरचा असून पाचशे किलोपर्यंत आण्विक शस्त्रास्त्र वाहून नेण्याची त्याची क्षमता आहे. तर अग्नि-१ क्षेपणास्त्राचा पल्ला ७०० ते ९०० किलोमीटर आहे. ते एक हजार किलोग्रॅम वजन वाहून नेऊ शकतं. आकाश प्राईम या क्षेपणास्त्राचीही यशस्वी चाचणी काल झाली. हे क्षेपणास्त्र साडेचार हजार मीटर किंवा त्याहून अधिक उंचीवरील लक्ष्याचाही भेद घेण्यास सक्षम आहे.

**<><><><>**

दारू घोटाळ्याप्रकरणी छत्तीसगडचे माजी मुख्यमंत्री भूपेश बघेल यांचा मुलगा चैतन्य बघेल याला ईडी अर्थात सक्तवसुली संचालनालयाने अटक केली आहे. चैतन्य बघेल याच्या घरावर ईडीने आज सकाळी छापा टाकला होता.

**<><><><>**

पहलगाम दहशतवादी हल्ल्याला जबाबदार द रेझिटन्स फ्रंट अर्थात टीआर एफ या गटाला अमेरिकेनं दहशतवादी संघटना म्हणून घोषित केलं आहे. अमेरिकेच्या परराष्ट्र विभागानं टीआरएफचा परदेशी दहशतवादी संघटना तसंच जागतिक दहशतवादी संघटना म्हणून विशेष यादीत समावेश केला असल्याचं अमेरिकेचे परराष्ट्र मंत्री मार्को रुबिओ यांनी

प्रसिद्ध केलेल्या पत्रकात म्हटलं आहे. टीआरएफ हा लष्कर ए तैयबाप्रणित गट आहे. अमेरिकेच्या या निर्णयाचं भारतानं स्वागत केलं आहे. परराष्ट्रव्यवहार मंत्री डॉ. एस जयशंकर यांनी समाजमाध्यमावर म्हटलंय की यामुळे दहशतवादाविरोधातल्या लढ्यात भारत अमेरिका सहकार्य अधिक दृढ झालं आहे.

<><><><>

हंगेरीत बुडापेस्ट इथं सुरू असलेल्या पोलॅक ईम्रे आणि वर्गा जानोस स्मृती जागतिक कुस्ती स्पर्धेत भारताच्या सुजीत कलकल याने काल पुरूषांच्या ६५ किलो वजनी गटात फ्रीस्टाईल प्रकारात सुवर्ण पदकाला गवसणी घातली. यापूर्वी ४ वेळा स्पर्धा जिंकणारा अझरबैजानचा अली राहीमझादे याचा त्याने ५-१ असा दणदणीत पराभव केला. या विजयामुळे युनायटेड वर्ल्ड रेसलिंग रँकिंग सिरीज स्पर्धेत भारताचं या वर्षातले हे पहिलं सुवर्णपदक ठरलं आहे. भारताच्या राहुलने जर्मनीच्या खेळाडूचा ४-० असा पराभव करत कांस्यपदक पटकावले आहे.

<><><><>

अमेरिकेत लास वेगास इथं सुरू असलेल्या फ्रीस्टाईल ग्रँड स्लॅम बुद्धिबळ स्पर्धेत भारताचा ग्रँडमास्टर अर्जुन एरिगेसी हा उपांत्य फेरीत स्थान मिळवणारा पहिला भारतीय खेळाडू ठरला आहे. २१ वर्षीय अर्जुननं उपांत्यपूर्व फेरीत उझबेकिस्तानच्या नोदिरबेक अब्दुसत्तोरोव्हचा पराभव केला.

या स्पर्धेत भारताच्या आर. प्रज्ञानंद यानं प्रथम मानांकित मॅग्नस कार्लसनविरुद्ध सामना जिंकून उपांत्यपूर्व फेरीत प्रवेश केला होता. मात्र, उपांत्यपूर्व फेरीत त्याला फॅबियानो कॅरुआनाकडून पराभव पत्करावा लागला.

<><><><>

फिडे महिला विश्वचषक बुद्धिबळ स्पर्धेत भारताच्या चारही स्पर्धक टायब्रेक मधे खेळणार आहेत. दिव्या देशमुख, आणि आर वैशाली, या दोघी आपापल्या प्रतिस्पर्ध्यांकडून पराजित झाल्यामुळे तर कोनोरु हम्पी आणि हरिका द्रोणवल्ली यांचे सामने अनिर्णित राहिल्याने आज टायब्रेकचे सामने होतील.

<><><><>

एटीपी (टेनिस) २५० मालिकेतल्या पुरूष दुहेरी स्पर्धेत भारताचा अनिरूद्ध चंद्रशेखर आणि त्याचा अमेरिकन जोडीदार रीझ स्टॅल्डर यांनी ऑस्ट्रेलियाचा बर्नार्ड टॉमिक आणि मेक्सिकोचा मॅन्युएल सांचेझ या जोडीचा पराभव करून उपांत्य फेरीत प्रवेश केला आहे.

स्वित्झर्लंडमध्ये ईएफजी स्वीस ओपन गस्टाडमध्ये आज उपांत्यफेरीत अर्जुन कढे आणि विजय सुंदर प्रशांत या भारतीय पुरूष जोडीचा सामना हेंड्रिक जेबेन्स आणि अल्बानो ऑलिवेट्टी यांच्याबरोबर होणार आहे. सामना संध्याकाळी ६ वाजता सुरू होईल.

<><><><>

राजस्थान आणि दक्षिण कर्नाटकसह देशाच्या बहुतांश भागात मुसळधार ते अतिमुसळधार पावसाची शक्यता असल्याचा अंदाज हवामान विभागानं वर्तवला आहे. येत्या आठवड्यात देशाच्या पूर्व, पश्चिम, वायव्य, ईशान्य तसंच मध्य आणि दक्षिण द्वीपकल्पीय भागात वादळी वारे विजांसह पाऊस पडण्याची शक्यता हवामान विभागाकडून वर्तवण्यात आली आहे. दिल्ली परिसरात ढगाळ आकाश आणि मध्यम पावसाचा अंदाज वर्तवला आहे.

//<><><><>//